**जिल्हा परिषदे अंतर्गत रस्ते व पूल दुरुस्ती व परिरक्षण कामे करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र.जिपर-२०१२/प्र.क्र.११८/पंरा-८
सार्वजनिक बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक -: १० सप्टेंबर २०१२.

**वाचा :-**

१) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.सीएटी-१०८७/प्र.क्र.९४/इ-२, दि.१४.६.१९८९

२) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.आरएमआर-२००२/प्र.क्र.१०१/रस्ते-१, दि.४.६.२००२

३) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र.२१९/रस्ते-१, दि.९.१०.२००७

४) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र.२५७/रस्ते-१, दि.२१.१.२००८

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.संकीर्ण-२००९/प्र.क्र.११६/रस्ते-१, दि.४.१२.२००९

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.४६७/रस्ते-१, दि.२१.११.२०११

७) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, परिपत्रक क्र.ग्रासयो-२००८/प्र.क्र.७५/यो-९, दि.२९.५.२००८

**प्रस्तावना :-**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या रस्त्यांचा दुरुस्ती व परिरक्षण हा कार्यक्रम "३०५४" या लेखाशिर्षांतर्गत निधीसह ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सदर योजना यापूर्वी

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येत होती. यावर्षीपासून सदर योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याने "३०५४" या लेखाशिर्षांतर्गत करावयाच्या कामांसंदर्भात सर्वसमावेशक धोरण ठरविणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१२-१३ पासून अंमलात आणावयाच्या कार्यपध्दती संदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषदेतंर्गत लेखाशीर्ष "३०५४" मधील रस्ते दुरुस्ती व परिरक्षण कार्यक्रम ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम पुढील सूचनेनुसार राबविण्यात यावा.

**१.० उपलब्ध होणारा संभाव्य निधी आणि कार्यक्रमाची एकूण किंमत :-**

१.१ चालू वर्षाचा कार्यक्रम तयार करण्यासाठी मागील वर्षाचे अंतिम सुधारित अनुदान आधारभूत राहील.

१.२ मागील वर्षाच्या अंतिम अनुदानातून मजुरांच्या वेतनाची चालू वर्षाची संभाव्य रक्कम वजा करावी.

१.३ उर्वरित रक्कमेच्या दीडपट किंमतीचा कार्यक्रम तयार करावा.

१.४ मजुरांच्या वेतनासाठी नंतर अतिरिक्त अनुदान मिळणार नाही. त्यामुळे सुरुवातीला ही रक्कम कमी दाखवून त्याद्वारे जास्त किंमतीचा कार्यक्रम प्रस्तावित करणे टाळावे.

१.५ कार्यक्रम मंजुरी ही बाब प्रधान नसून किंमत प्रधान राहील. त्यासाठी मंजूर किंमतीच्या ८५ ते ९० टक्के या मर्यादेतच अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी द्यावी. त्यामुळे अंतिम खर्च मंजूर मर्यादेतच राहील.

१.६ कार्यक्रम मंजूर झाल्याखेरीज निधीचे वाटप करण्यात येणार नाही.

१.७ योजनेतर कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे ४ गट राहतील. एका गटातील कामांसाठी उपलब्ध असणारी तरतूद दुसऱ्या गटातील कार्यक्रमासाठी वापरता येणार नाही. असे एका गटातून दुसऱ्या गटात निधीचे

पुनर्विनियोजन करावयाचे असेल तर त्याचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजूर करुन घ्यावा.

**२.० गट-अ :- रस्ते "वाहतुकी योग्य" स्थितीत राखण्याची कामे (सर्वसाधारण दुरुस्ती )**

२.१ हा कार्यक्रम कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम ) यांच्या स्तरावर मंजूर करण्यात यावा.

२.२ यामधील सर्व कामे खात्याच्या मजुरांमार्फतच करण्यात यावीत.

२.३ जर कंत्राटदार नेमून ही कामे करावयाची असतील तर त्याला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक राहील. अशी पूर्वपरवानगी देताना त्याची कारणमिमांसा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अभिलेख्यात नोंदवावी.

२.४ या गटाखालील एकूण कामांची किंमत वरील १.३ नुसार निश्चित केलेल्या कार्यक्रमाच्या १५ टक्के पर्यतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल.

२.५ या गटामध्ये खालील प्रकारची कामे करणे अभिप्रेत आहे :-

- खड्डे भरणे (शासन परिपत्रक क्र.सा.बां.वि-संकीर्ण-०७९८/१६८/ भाग-१/रस्ते-१,दिनांक १३.५.२००२ प्रमाणे)
- डोंगरी गटारे (catch water drain ) खणणे व सुस्थितीत राखणे,
- अस्तित्वातील गटारे पुरेशी खोल राखणे,
- अस्तित्वातील गटारांना अस्तरीकरण करणे,
- नवी गटारे खणणे,
- बाजू पट्टया तासणे / बाजूपट्टयांचा योग्य उतार ( Camber ) राखणे,
- उखडलेले कठडे,पॅरपेट इ. ची पुनर्बांधणी,
- किरकोळ स्वरुपात वाहून गेलेल्या भरावाची पुनर्स्थापना (Restoring Rain Cuts )

**३.० गट ब :- रस्त्याचा दर्जा टिकविण्याची / सुधारण्याची कामे :-**

३.१ हा कार्यक्रम शासन स्तरावर मंजूर करण्यात येईल.

३.२ या गटाखालील एकूण कामांची किंमत वरील १.३ नुसार निश्चित केलेल्या कार्यक्रमांच्या ७० टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल.

३.३ या गटामध्ये खालील प्रकारची कामे करणे अभिप्रेत आहे :-

- रस्त्याची विशेष दुरुस्ती / सुधारणा,
- डांबरी नुतनीकरण,
- थेट रस्ते नुतनीकरण,
- थेट रस्ते सुधारणा,
- खडी नुतनीकरण,
- रुंदीकरण
- कोकण-मराठवाडा-विदर्भ विकास कार्यक्रमातील कामे. (मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर झालेल्या वावाच्या मर्यादेत)

**४.० गट क :- विशिष्ट प्रयोजनाची कामे :-**

४.१ हा कार्यक्रम शासनाची पूर्वसहमती घेऊन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावर मंजूर करता येईल.

४.२ या गटाखालील एकूण कामांची किंमत वरील १.३ नुसार निश्चित केलेल्या कार्यक्रमाच्या १० टक्के पर्यंतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल. सदर प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत शासनास सादर करावा.

४.३ या गटामध्ये खालील प्रकारची कामे करणे अभिप्रेत आहेत :-

- अपघातप्रवण क्षेत्रांची सुधारणा
- अपघातप्रवण क्षेत्राची सुधारणा वगळून अन्य अभियांत्रिकी सुधारणा
- कमकुवत पुलांची तसेच मोठया पुलांची दुरुस्ती / मजबुतीकरण
- गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी मुरुमी रस्त्यांचे खडीकरण. (यामध्ये लोकसंख्या गटनिहाय एका गावास किती दिशांनी बारमाही जोडरस्ते असावे यासंबंधीच्या निकषाचे पालन होणे अभिप्रेत आहे.)
- गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी मोऱ्या व लहान रपटयांची मूळ कामे (यामध्ये लोकसंख्या गटनिहाय एका गावास किती दिशांनी बारमाही जोडरस्ते असावे यासंबंधीच्या निकषाचे पालन होणे अभिप्रेत आहे.)
- लहान मोऱ्यांची सुधारणा

- गट क खालील कामाच्या एकूण रक्कमेच्या मर्यादेत ५ टक्के पर्यंतच खालील कामांचा अंतर्भाव करण्यात यावा.

  १. Utility duck
  २. शाळा / कॉलेज / हॉस्पिटल जवळ झेब्राक्रॉसिंग तसेच पदपथ बांधणे
  ३. ट्रॅफिक सिंग्नल बसविणे
  ४. Cateyes
  ५. Rumbler / Rumbling Strips
  ६. Blinkers / Solar blinker बसविणे.
  ७. Turning च्या जागेवर Reflective tape
  ८. ट्रॅफिक सिंग्नलचे बोर्ड (ट्रॅफिक helpline no. सह )
  ९. जंक्शन मार्किग करणे
  १०.अपघातास प्रतिबंध करणारी इतर कामे

**५.० गट ड :- अन्य व संकीर्ण :-**

५.१ हा कार्यक्रम अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या पूर्व सहमतीनंतर कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग यांच्या स्तरावर मंजूर करता येईल.

५.२ या गटाखालील एकूण कामांची किंमत वरील १.३ नुसार निश्चित केलेल्या कार्यक्रमाच्या ५ टक्के पर्यतच्या मर्यादेतच मंजूर करता येईल.

५.३ यामध्ये "रस्त्याची देखभाल व दुरुस्ती" अंतर्गत उपरोक्त 'अ', 'ब' व 'क' मध्ये समाविष्ट नसणाऱ्या प्रकारची कामे असतील. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत यापूर्वी घेत असलेले गट-इ चे कार्यक्रम सुध्दा गट-ड अंतर्गत घेण्यात यावे.

**६.० कार्यक्रम प्रस्तावित करण्याची कार्यपध्दती :-**

६.१ प्रत्येक जिल्हयातील कामासाठीच्या किंमतीच्या एकूण मर्यादेत राहील ( कृपया १.३, २.४, ३.२, ४.२, ५.२ पहावे ) अशा किंमतीचा कार्यक्रम प्रस्तावित करावा. गट-अ व गट-ड मधील काही कामे आकस्मिक स्वरुपाची असल्याने सुरुवातीलाच त्याच्या संपूर्ण आर्थिक वावाचा कार्यक्रम मंजूर करु नये. काही आर्थिक वाव राखून ठेवावा.

६.२ त्यामुळे कार्यक्रम प्रस्तावित करताना "काम पूर्ण पण देयक अदा करणे बाकी " या स्वरुपाची कामे सर्वप्रथम घ्यावीत. त्यानंतर चालू / प्रगतीतील कामांसाठी, प्रत्यक्ष केलेल्या कामांचे देयक अदा करायचे आहे, अशी कामे प्रस्तावित करावीत.

६.३ असे करताना चालू / प्रगतीत असणाऱ्या कामांच्या मंजूर तरतुदी व प्रत्यक्ष झालेले काम आणि भौतिकदृष्टया प्रगतीत असलेल्या बाबी यांच्या पार्श्वभूमीवर तरतुदींचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन आवश्यक तेवढाच मर्यादीत वाव व उर्वरित किंमत प्रस्तावित करावी.

६.४ सरतेशेवटी मंजूर पण सुरु न झालेल्या कामांचा नव्याने सर्वकष आढावा घेऊन त्यातील आवश्यकता / निकड असणारी कामे / वाव नव्याने प्रस्तावित करावा.

६.५ त्यानंतर आर्थिक वाव शिल्लक राहिला, तरच नवी कामे प्रस्तावित करावी.

७.० कार्यक्रम प्रस्तावित करण्याची कार्यपध्दती सोबतच्या परिशिष्ट-अ,ब व क प्रमाणे निकष व मानकानुसारच राहील. तसेच खालील गोष्टींचे कटाक्षाने पालन करावे.

७.१ एकूण कार्यक्रम किंमतीच्या गटनिहाय पुढील मर्यादेतच मंजूर करण्यात यावा.

| | |
|---|---|
| गट-अ | १५ टक्के |
| गट-ब | ७० टक्के |
| गट-क | १० टक्के |
| गट-ड | ५ टक्के |

७.२ प्रस्तावित कामास जॉब क्रमांक देण्याची पध्दती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पध्दतीनुसारच ठेवण्यात यावी .

७.३ कार्यक्रम प्रस्तावित करताना मतदारसंघ निहाय समतोल राखूनच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

८.(अ) या कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे महसूल विभाग स्तरावर दक्षता व गुण नियंत्रण शाखा उपलब्ध आहे .परंतु जिल्हा परिषदेकडे अशा स्वरुपाची यंत्रणा नाही. हे पहाता या

कामासाठी काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यावर संबंधीत कंत्राटदार यांनी तपासणी केल्यावर

(१) जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंता (बांधकाम विभाग) व उप अभियंता (बांधकाम विभाग) यांनी त्याची तपासणी करावी.

(२) काही निवडक कामाची तपासणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) यांनी करावी.

(३) जेथे तक्रार येईल तेथे कामाची संयुक्त तपासणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) यांच्या समवेत करावी.

(ब) तद्वत: एक त्रयस्थ मंडळ म्हणून प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर तपासणी करण्याकरीता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या उपलब्ध असलेल्या राज्यस्तरीय गुणवत्ता नियंत्रक यांच्याकडून ही तपासणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना करुन घेता येवू शकेल. सदर योजनेअंतर्गत होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावीत यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांचे अधिपत्याखालील पॅनेलवरील राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM) यांचेकडून संबंधित जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामांची तपासणी करुन घ्यावी. यासाठी जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांचेकडून आवश्यकतेनुसार यादी घ्यावी व त्याप्रमाणे वाटप करावे. यासाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या १ टक्का या दराने मोबदला देण्यात यावा व ही रक्कम कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर यंत्रणेकडून कामाच्या विविध टप्प्यावर तपासणी करण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही अचानकपणे यापैकी कोणत्याही कामाची तपासणी करावी.

या कामांची तपासणी करण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंतर्गत जिल्हा प्रयोगशाळा उपलब्ध आहे तेथे या कामाची तपासणी करण्यात यावी. या कामाच्या सविस्तर सुचना शासन परिपत्रक क्र.ग्रासयो-२००८/ प्रक्र.७५/ योजना-९, दिनांक २९ मे, २००८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

९. तसेच या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामामध्ये दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा सार्वजनिक बांधकाम विभागाने संदर्भाधीन १ येथील

शासन निर्णयान्वये निश्चित केलेला आहे त्या प्रमाणेच दोष निवारण कालावधी संदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

१०.तसेच ग्रामीण रस्त्यावर काम करतांना वेगवेगळया यंत्रणाद्वारे केबलींगची कामे करणे, पाईपलाईनसाठी खोदाई करणे तसेच रस्त्यावरील व नाल्यामधील पाण्याचा निचरा न होणे यामुळे रस्त्याची कामे कमकुवत होतात म्हणून अपघातांची संख्या वाढते, संबंधित यंत्रणेकडून योग्य त्या दर्जाची कामे केली जात नाहीत. यास्तव अशा यंत्रणांना कामांना मंजुरी देताना करारनाम्यात ही कामे पूर्ववत आवश्यक त्या गुणवत्तेनुसार करुन घ्यावीत याचा स्पष्ट उल्लेख असावा. तसेच कामे योग्य त्या दर्जाची राहतील हे पाहण्याचे काम कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कटाक्षाने करावे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या सांकेतिक स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक 201209111034021201 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( दि.ग.मोरे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व), विधानमंडळ, मुंबई.
७. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व).
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
९. मा.अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व) मंत्रालयीन विभाग, महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय,मुंबई.
१०. सर्व विभागीय आयुक्त, सर्व महसूल विभाग.
११. महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) (सर्व).
१५.निवड नस्ती, (कार्यासन पंरा-८).

## परिशिष्ट-अ

### १. कार्यक्रमाचा तपशील देण्याचे प्रपत्र :-

गट-ब आणि क मधील कामांसाठी कार्यक्रम शासनाकडे सादर करताना स्थानिक क्षेत्रासाठी जिल्हानिहाय (विभागनिहाय नव्हे) स्वतंत्र पुस्तिकेच्या रुपात प्रस्ताव सादर करावेत. मात्र प्रपत्राच्या रकान्यात संबंधित विभागाचे नाव नमूद करावयाचे आहे. त्यासाठीचे प्रपत्र परिशिष्ट- **"ब"** **"क"** मध्ये दिले आहे. सदर प्रपत्रात माहिती भरण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना आहेत:-

- जिल्हयाचे नाव लिहावे.
- स्थानिक क्षेत्र पैकी योग्य ते एक नमूद करावे.
- गट ब अथवा क आणि त्यानुसार त्याचे शीर्षक नमूद करावे.
- गट ब आणि क या प्रत्येकातील उपशीर्षकनिहाय प्रस्ताव अपेक्षित आहेत.
- प्रत्येक उपशीर्षकातील कामाची यादी नव्या पृष्ठावर सुरु करावी (उपशीर्षकासाठी कृपया ३.३ व ४.३ पहावे)
- रस्ता संवर्ग मध्ये इजिमा, ग्रामा पैकी योग्य ते नमूद करुन (म्हणजे र.वि.योजनाबाहय रस्ता नाही हे स्पष्ट करुन) पुढे रस्ता क्रमांक नमूद करावा.
- लांबी नमूद करताना र.वि.यो. नुसार साखळी क्रमांक नमूद करावे, मधल्याच लांबीतील काम असेल तर ०/० ते क्ष प्रमाणे क्ष लांबी असे नमूद करु नये.
- कामाचा वाव लिहिताना खडीथर (तपशील शेरा रकान्यात नमूद करावा) डांबर काम (तपशील शेरा) रकान्यात नमूद करावा. रुंदीकरण (सध्याची व प्रस्तावित रुंदी शेरा रकान्यात नमूद करावी) पूल, मोऱ्या इत्यादी आवश्यकता भासल्यास वावासाठी रकाने वाढवावे.
- अंदाजित किंमत रु.लक्ष मध्ये द्यावी. या रकान्याची सर्व कामांची बेरीज ही गतवर्षाचे अंतिम अनुदान (मजुरांचे वेतन वगळून) गुणिले १.५ या एकूण कार्यक्रम किंमतीच्या ७० टक्के (गट-ब ) आणि १० टक्के (गट-क) या मर्यादेत असावी.
- प्रपत्रातील रकाना २८ हा शासन स्तरावर नमूद केला जाईल. त्यासाठी प्रस्ताव सादर करताना अकरा आकडी सांकेतांकाने जॉब क्रमांक लिहिणे शक्य होईल एवढी जागा असणारा रकाना ठेवूनच प्रस्ताव सादर करावे.

- जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व केवळ देयक अदा करण्यासाठी निधीची मागणी आहे, अशी कामे स्वतंत्रपणे नमूद करावी आणि जी कामे चालू / प्रगतीत आहेत त्यांची १.४.२०१२ ची उर्वरित किंमत नमूद करावी व त्या किंमतीतून जो वाव साधला जाणार आहे तो वाव नमूद करावा. अंशत: झालेल्या प्रगतीतील कामांचे देयक अदा करावयाचे असेल, तर जरी काम ३१.३.२०१२ आधी झाले असेल तरी त्याचा वाव कामाच्या वावात समाविष्ट करावा, म्हणजेच, **ज्या वावांचे काम अद्याप करायचे आहे (१.४.२०१२ ची स्थिती) अधिक जे काम केले पण देयक द्यायचे आहे, असा सर्व वाव कामाच्या वावात नमूद करावा. काम जेव्हा मुळात मंजूर झाले त्या मंजुरीच्या वेळचा वाव नमूद करु नये.**
- गट-ब आणि गट-क मधील कामांचे कार्यक्रम सादर करताना, तालुका नकाशे सादर करावे. तालुका नकाशावर अपृष्ठांकित खडीचे आणि डांबरी / काँक्रीट पृष्ठभागाचे रस्ते वेगवेगळया रंगाच्या हायलायटर पेनने रंगवावे. (स्केचपेन कृपया वापरु नये) एका जिल्हयाच्या सर्व तालुका नकाशांसाठी पृष्ठभाग निहाय रस्त्यासाठी समान ( त्या-त्या पृष्ठभागासाठी तेच) रंग वापरावे. प्रस्तावित कामे बी पेन्सिलने (शाईने नको) दाखवावी.
- गट-अ आणि गट-ड मधील कामांसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यथोचित प्रपत्र करावे. त्याद्वारे भौतिक वाव व साध्य यांची माहिती सहजपणे उपलब्ध असणे अपेक्षित आहे.
- गट-अ आणि गट-ड मधील कामांच्या निधीच्या मागणीचे प्रस्ताव मंजूर कार्यक्रमाचा सर्व तपशील नमूद करुन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावे.
- गट-ब आणि गट-क मधील कार्यक्रम सादर करताना पुस्तिकेसह संगणक soft copy-unicode मध्ये १२ Font मध्ये पाठवावी. कार्यक्रम प्रपत्र एक्सेल मध्ये भरावे.

२. **अशाप्रकारे कार्यक्रम तयार केल्यानंतर त्याद्वारे योजनेतर निधीसाठी आता पुढीलप्रमाणे २३ वा जास्त उपशीर्षे राहतील**

| शीर्षक | उपशीर्षाची संख्या व क्रमांक |
|---|---|
| मजुरांचे वेतन | १ (परिशिष्ट 'ब' मधील क्र.१) |
| गट अ :- | क्र.२.५ मध्ये नमूद केलेली ८ उपशीर्षे (क्र. २ ते ९) |
| गट ब :- | क्र.३.३ मध्ये नमूद केलेली ७ उपशीर्षे (क्र.१० ते १६) |
| गट क :- | क्र.४.३ मध्ये नमूद केलेली ७ उपशीर्षे (क्र. १७ ते २३) |
| गट-ड :- | आवश्यकतेप्रमाणे क्र.२४ पासून पुढची उपशीर्षे |

तात्काळ संदर्भासाठी वरीलप्रमाणे १ ते २३ उपशीर्षांची यादी परिशिष्टात नमूद केली आहे.

३. जॉब क्रमांक हे अकरा आकडी सांकेतांकाच्या (सहा + पाच) रुपात असतील.
सांकेतांक :- XX – XX – XX XX-XXX

XX म्हणजे वर्ष (यंदा १२)
XX म्हणजे जिल्हा (पंतप्रधान ग्रामसडक योजनेप्रमाणे)
XX म्हणजे त्या जिल्हयातील विभाग (स्थानिक ओळखण्यासाठी) स्थानिक क्षेत्रासाठी स्था.१, स्था.२, स्था.३ इत्यादी आणि
XX उपशीर्षक (कार्यक्रम गट अ,ब,क,ड पैकी कोणता, म्हणजे कार्यक्रम कोणत्या स्तरावर मंजूर झाला)
XXX जॉब क्रमांक ०११ ते ९९९
सांकेतांक देण्याची वरीलप्रमाणे पध्दत ठेवण्यात यावी.
सांकेतांकावरुन कामाचा प्रकार कसा ओळखता येईल, हे खालील उदाहणांद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.

(१)१२ २८ स्था.१ १२ ०१० म्हणजे
१२ :- सन २०१२-१३ चा कार्यक्रम
२८ :- जिल्हा सिंधुदुर्ग
स्था.१ :- त्या जिल्हयातील विभागचा क्रमांक
१२ :- गट-ब, उपशीर्ष क्र.१२, थेट रस्ते नूतनीकरण
०१० :- त्या जिल्हयातील (विभागातील नव्हे) या संवर्गाचे दहावे काम.

योजनेत्तर कामासाठी उपरोक्त कार्यपध्दती दि.१.४.२०१२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात येईल. त्यामुळे आता वरीलप्रमाणे अ,ब,क आणि ड मधील यथोचित गटात समावेश करुनच कार्यक्रम मंजुरीसाठी (गट ब आणि क) आणि निधी मागणीसाठी (गट अ आणि ड) प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. अशा प्रस्तावांवर संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात.

## परिशिष्ट-ब

## योजनेतर कार्यक्रमासाठी कामांची उपशीर्षे

१. मजूरांचे वेतन
२. खड्डे भरणे (शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ०७९८/१६८/भाग-१/रस्ते-१, दि.१३.५.२००२ प्रमाणे)
३. डोंगरी गटारे (catch water drain) खणणे व सुस्थितीत राखणे
४. अस्तित्वातील गटारे पुरेशी खोल राखणे
५. अस्तित्वातील गटारांना अस्तरीकरण करणे
६. नवीन गटारे खणणे
७. बाजू पट्टया तासणे/बाजूपट्टयांचा योग्य उतार (camber) राखणे
८. उखडलेले कठडे, पॅरॅपेट इ.ची पुनर्बांधणी
९. किरकोळ स्वरुपात वाहून गेलेल्या भरावाची पुनर्स्थापना (Restoring Rain cuts)
१०. रस्त्याची विशेष दुरुस्ती / सुधारणा
११. डांबरी नुतनीकरण
१२. थेट रस्ते नुतनीकरण
१३. थेट रस्ते सुधारणा
१४. खडी नुतनीकरण
१५. रुंदीकरण
१६. कोकण-मराठवाडा-विदर्भ विकास कार्यक्रमातील कामे (मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर झालेल्या वावाच्या मर्यादेत )
१७. अपघातप्रवण क्षेत्रांची सुधारणा
१८. अपघातप्रवण क्षेत्राची सुधारणा वगळून अन्य अभियांत्रिकी सुधारणा
१९. कमकुवत पुलांची तसेच मोठया पुलांची दुरुस्ती / मजबुतीकरण
२०. गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी मुरुमी रस्त्यांचे खडीकरण.(यामध्ये लोकसंख्या गटनिहाय एका गावास किती दिशांनी बारमाही जोडरस्ते असावे यासंबंधीच्या निकषाचे पालन होणे अभिप्रेत आहे.)
२१. गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी मोऱ्या व लहान रपटयांची मूळ कामे (यामध्ये लोकसंख्या गटनिहाय एका गावास किती दिशांनी बारमाही जोडरस्ते असावे यासंबंधीच्या निकषाचे पालन होणे अभिप्रेत आहे)
२२. लहान मोऱ्यांची सुधारणा.
२३. परिच्छेद ४.३ मधील ५ टक्के मर्यादेतील कामे

## परिशिष्ट- क

जिल्हा जिल्हा कोड क्षेत्र गट व गटशिर्षक

| अ. क्र. | विभागाचे नांव | कामाचे संक्षिप्त नांव | रस्ता संवर्ग व क्रमांक | लांबी कि.मी. | | | दि.१.४.२०१२ नंतर केलेल्या खर्चाद्वारे साधला जाणारा कामाचा वाव (भौतिक) | | | | दि.१.४.२०१२ उर्वरित अंदाजित किंमत | सन २०१२-१३ साठी मागणी | ३१.३.१३ ची संभाव्य उर्वरित किंमत | कामाची सद्य:स्थिती (पूर्ण, प्रगती, सुरु नाही, मंजूर नाही) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | पासून | पर्यंत | एकूण | खडी काम | डांबर काम | डांबरी करण | पूल-मो-या | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

### उपशीर्षक

| २०११-१२ मध्ये साधलेला वाव | | | | २०१२-१३ च्या मागणीद्वारे साधला जाणारा वाव | | | | ३१.३.२०१३ चा संभाव्य वाव | | | | जॉब क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खडी काम | डांबर काम | रुंदी करण | पुल मो-या | खडीकाम | डांबर काम | रुंदी करण | पूल मो-या | खडी करण | डांबर काम | रुंदी करण | पूल मो-या | | |
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ |